महाराष्ट्र टाइम्स

# वसंतदादा इंजिनीअरिंग कॉलेजला दिलासा

Maharashtra Times | Jun 23, 2017, 02.06 AM IST




म. टा. प्रतिनिधी, मुंबई

सायन येथील वसंतदादा पाटील इंजिनीअरिंग कॉलेजला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलासा दिला आहे. गेल्या वर्षी कॉलेजातील ज्या ४३८ विद्यार्थ्यांना इतरत्र सामावून घेण्यात आले होते, त्या विद्यार्थ्यांना पुन्हा कॉलजमध्ये सामावून घेण्यास राज्य तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिली आहे.

सायन येथील वसंतदादा पाटील इंजिनीअरिंग कॉलेजकडे 'ओसी' नसल्याचा ठपका ठेवून द्वितीय वर्षीय अभ्यासक्रमासाठी झालेल्या ४३८ विद्यार्थ्यांना इतरत्र स्थलांतरीत करण्याचा निर्णय 'डीटीई'ने जाहीर केला होता. मात्र, गेल्या वर्षभराच्या काळात या कॉलेजने सर्व अटी-शर्तींची पूर्तता केल्याने आता ४३८ विद्यार्थी पुन्हा या कॉलेजात स्थलांतरित करण्यास 'डीटीई'ने मान्यता दिली आहे.

'या निर्णयाचे मी मनापासून स्वागत करतो. मागील वर्षी स्थलांतरीत झालेल्या ४३६ विद्यार्थ्यांपैकी जास्तीत जास्त विद्यार्थी आमच्या कॉलेजात परत येतील, असा विश्वास आहे. आम्ही त्यांना उच्च दर्जाचे शिक्षण पुरवू', असे वसंतदादा पाटील कॉलेजचे प्राचार्य आप्पासाहेब देसाई म्हणाले.

# Students allowed to shift back to their college after it obtains OC

**Mumbai:** Students from Vasantdada Patil Pratishthan's College of Engineering, asked to shift to other colleges last year following a Supreme Court order, have been permitted to shift back to the college.

The college had not been given an extension of affiliation last year by the All India Council of Technical Education for lack of an occupation certificate and nearly 450 students had to be asked to shift to nearby engineering institutes. The students were accommodated in 15 other colleges.

As the college has now obtained the occupation certificate, the directorate of technical education has asked the students to move back to their original college. TNN